बीड । बुधवार
०४.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ६४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१



# कुटुंबापेक्षाही काकणभर अधिक प्रेम जनतेने दिले; त्याची उतराई होण्याचा आयुष्यभर प्रयत्न करेन: ना. पंकजाताई मुंडे

# गोपीनाथराव मुंडेंसारखे आता ऐसे कोणी पुढे होणे नाही



- रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक







- लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी सकाळपासूनच राज्यभरातून कार्यकर्त्यांची गोपीनाथ गडावर गर्दी
- स्मृतिदिनानिमित्त गडावर आकर्षक कमान, मुंडे साहेबांचे भव्य कट आऊट तसेच त्यांच्या जीवनावरील चित्र प्रदर्शनी सर्वांचे लक्ष वेधून घेत होते.
- ना. पंकजाताई मुंडे, डॉ प्रीतमताई मुंडे, आई प्रज्ञाताई, बंधू आमदार धनंजय मुंडे, नातू आर्यमान पालवे, अगस्त्य खाडे, काकू रूक्मिणबाई मुंडे, चुलत बंधू अजय मुंडे, अभय मुंडे, रमेश कराड आदी कुटुंबातील सदस्य उपस्थित
- ना. पंकजाताई, प्रीतमताई, प्रज्ञाताई यांचेसह धनंजय मुंडे यांनी सकाळी मुंडे साहेबांच्या समाधीसमोर नतमस्तक झाले.
- स्मृतिदिनानिमित्त गडावर रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, पशुसंवर्धन विभागाच्या वतीने योजनांची माहिती
- शेळी मेंढी पालकांना औषधाचे वाटप, वृक्षांच्या रोपांचे तसेच कापडी पिशवीचे वाटप, गडावर 'नो प्लास्टिक' आदी उपक्रम राबविण्यात आले.
- राज्यभरातून विविध राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.







**परळी वै. । प्रतिनिधी**

माझे पिता आणि आपले नेता लोकनेते गोपीनाथराव मुंडे हे पुण्यात्मा होते. त्यांनी आयुष्यभर कोणाचेही वाईट चिंतले नाही. सदैव वंचितांचे वाली आणि वाणी होण्याचा त्यांनी मार्ग निवडला. त्यातूनच त्यांचे मोठेपण निर्माण झाले.आज त्यांच्या जाण्यानंतर अकरा वर्षांनीही हा विराट जनसमुदाय हेच दाखवून देतो. मुंडे साहेबांनंतर तुम्ही आम्हाला बळ दिलं. आमच्या परिवाराला शक्ती दिली. त्यामुळे कुटुंबापेक्षाही काकणभर अधिकचे प्रेम तेम्ही केलेलं आहे. त्या प्रेमातून उतराई होण्याचा आयुष्यभर प्रयत्न करेन अशी ग्वाही राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गोपीनाथ गडावरील कार्यक्रमात दिली. तर गोपीनाथराव मुंडेंसारखे आता ऐसे कोणी पुढे होणे नाही असे वर्णन रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांनी कीर्तन प्रसंगी बोलताना केले.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अकराव्या पुण्यतिथीनिमित्त गोपीनाथ गडावर आयोजित कार्यक्रमात बोलताना ना पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांशी आत्मीय संवाद साधला. या ठिकाणी उपस्थित प्रत्येक जण म्हणजे गोपीनाथ मुंडे परिवार असल्याचे आवर्जून सांगत हा आपल्या परिवाराचा कार्यक्रम असुन ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाने पुन्हा तसाच दु:खद प्रसंग

**गोपीनाथगडावरील कार्यक्रमातही स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाचे दु:ख व्यक्त करत पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, मुंडे साहेबांच्या आपघाताच्या कटू आठवणीसारखाच पुन्हा तसाच दु:खद प्रसंग स्व.आर.टी. देशमुखांच्या निधनाने आला.आर. टी. देशमुख जिजा यांचे निधन ही अतिशय दु:खद घटना झाली. आपण गोपीनाथ गडावर आवर्जून त्यांचा फोटो लावला. लेक म्हणून सूतकही पाळले. ना जात, ना पंथ ना धर्म परंतु असे असंख्य ऋणानुबंध मुंडे साहेबांनी निर्माण केलेले आहेत.मुंडे साहेबांचा हाच वारसा पुढे घेऊन जाण्याचा आपला प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.**



*माजी केंद्रीय मंत्री, लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज माजी मंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी गोपीनाथ गड (पांगरी) येथील त्यांच्या स्मृती स्थळी जाऊन पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुंडे परिवारातील सदस्य तथा पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोपीनाथ गड येथे पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रम व ह. भ. प. रामराव महाराज ढोक यांच्या कीर्तन प्रसंगी धनंजय मुंडे उपस्थित राहिले आहेत.*



# ना. पंकजाताई मुंडेंना उमाताई समशेट्टे परिवाराची अनोखी भेट

## लोकनेत्याच्या स्मृतिदिनी दिली गोमाता ; गोपीनाथ गड करणार गोमातेचा सांभाळ

**परळी वै. । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचा अकरावा स्मृतिदिन आज विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा झाला. या निमित्ताने गोपीनाथ गडावर अनेक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगानेच आज गोपीनाथ गडावर गोमातेची अनोखी भेट भाजपा शहराध्यक्षा उमाताई समशेट्टी यांनी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांना दिली. या गोमातेचा सांभाळ करण्याची जबाबदारी गोपीनाथ गडाने घेतली आहे. दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्याशी प्रत्येक कार्यकर्ता व व्यक्तीपरत्वे भावना जोडलेल्या आहेत. गोपीनाथ गड हे समर्थक व मुंडे प्रेमींसाठी एक देवालयच बनलेले आहे. गोपीनाथ गडावर तीन शक्तीपिठांचे एकत्र मंदिरही आहे. याठिकाणी गोमाता असावी या भावनेपोटी समशेट्टी परिवाराने यांनी एक गोंडस गोमाता (कालवड) गोपीनाथगडाला भेट देण्याचा निर्णय घेतला. उमाताई समशेट्टी यांनी ही गोमाता ▶▶ उर्वरित पान २ वर



# आत्महत्या करू नका

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरण सध्या राज्यभर गाजत आहे. ज्याच्यावर डोळे झाकून विश्वास टाकला, ज्याच्यासोबत सात जन्माची गाठ बांधण्यासाठी घरच्यांकडे हट्ट केला अशा माणसाने विश्वासाला तडा दिला, सासरच्यांनी हाल केले आणि एक सुशिक्षित सुज्ञ तरूणी आपल्या पोटच्या गोळ्याला एकटी टाकून परलोकवासी झाली. आज समस्त राज्याच्या भावना वैष्णवीच्या पाठीशी आहेत त्यामुळे आज वैष्णवीच्या सासरच्या मंडळींकडून आणि त्यांच्या वकिलांकडून जे आरोप केले जात आहेत त्याचा सर्वत्र निषेध केला जात आहे. वैष्णवी हगवणे यांच्या सासरच्यांचा एका पक्षाच्या पक्षप्रमुखाशी थेट संबंध असल्याने हे प्रकरण सध्या हायप्रोफाईल बनले आहे. परिणामी समस्त वृत्तवाहिन्या या प्रकरणातील लहान सहान अपडेट्स जाणून घेण्यासाठी लक्ष ठेवून आहेत. दुसरीकडे चालू घडामोडींवर लक्ष टाकले असता मागील आठवडाभरात राज्यात आत्महत्यांची एकामागोमाग एक प्रकरणे उघडकीस आली आहेत. एप्रिल महिन्यात तळोजा परिसरात सोनम नावाच्या तरुणीने पोटच्या मुलीची हत्या करून स्वतः गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली होती. या प्रकरणाची आता उकल झाली असून वंशाला दिवा देऊ शकत नसल्याने सासरची मंडळी करत असलेल्या छळाला कंटाळून सोनमने आत्महत्या केल्याचे उघड झाले. परभणीतील एका २१ वर्षीय तरुणीनेही सासरच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्याची घटना या आठवड्यात घडली. चुलत भावासोबत असलेल्या प्रेमसंबंधांना विरोध केल्याने उल्हासनगरातील एका १६ वर्षीय मुलीने आत्महत्या केल्याची घटनाही नुकतीच वाचनात आली. अंबरनाथ तालुक्यातील कुशीवली गावात एका प्रेमी युगुलाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली. डोंबिवलीतील देसलेपाडा परिसरात राहणाऱ्या मोहित नावाच्या एका ३० वर्षीय तरुणाने विष प्राशन करून आपल्या राहत्या घरात आत्महत्या केली. ऑनलाईन गेमिंगच्या आहारी गेल्याने कर्जबाजारी झालेल्या मोहितने कर्ज चुकवणे अवघड झाल्याने आत्महत्या केल्याचे कारण पुढे आले आहे. चंदीगडमधील पंचकुला येथील सात जणांच्या संपूर्ण कुटुंबाने कर्जबाजारीपणामुळे विष प्राशन कल्याची घटना याच आठवड्यात घडली. या सात जणांमध्ये तीन लहान मुलांचाही समावेश आहे. रत्नागिरीतील एका पोलीस पाटलाने आत्महत्या केल्याची घटनाही नुकतीच घडली. या सर्व घटना केवळ एका आठवड्यातील आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या बीड जिल्ह्यात गेल्या ६ महिन्यांत १०० हुन अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे वृत्तही हल्लीच प्रकाशित झाले आहे.

एका सर्वेक्षणानुसार देशातील १३ टक्के तरुण कोणत्या ना कोणत्या तणावामुळे ग्रस्त असतात. जगभरातील तरुणांच्या आत्महत्यांपैकी १० टक्के आत्महत्या केवळ भारतात होतात. हा आकडा दोन लाखांच्या घरात असतो, त्यातील एक लाख हे १५ ते ३५ वयोगटांतील असतात, नॅशनल क्राईम ब्युरोच्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षांत आत्महत्यांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. परीक्षेत अपेक्षित गुण न मिळाल्याने विद्यार्थ्यांची आत्महत्या, प्रेमात अपयश आल्याने तरुणांची आत्महत्या, दुर्धर आजाराने ग्रस्त झाल्याने रुग्णाची आत्महत्या, नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळाल्याने नोकरदारांची आत्महत्या, व्यवसायात कर्जबाजारी झाल्यामुळे व्यावसायिकाची आत्महत्या, कामाचा ताण सहन न झाल्याने कर्मचाऱ्यांची आत्महत्या, यांसारख्या घटनांचे सध्या पीक आले आहे. आलेल्या संकटाचा सामना करण्याची उमेदच संपून गेल्यामुळे मनुष्य आत्महत्येचा मार्ग स्वीकारतो. ऐन उमेदीच्या काळात आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घेण्यामागे अनेक भौतिक आणि मानसिक करणे असू शकतात. मात्र आज हा टोकाचा निर्णय घेण्यासारखी परिस्थिती निर्माण करण्यामागे कुठेतरी आपणच कारणीभूत आहोत याचाही विचार आत्महत्या करणाऱ्याने करायला नको का ? परीक्षेत अपेक्षित यश मिळाले नाही किंवा परीक्षेत कॉपी करताना पकडले यांसारख्या क्षुल्लक कारणांमुळे विद्यार्थी आत्महत्या करतात. पालकांच्या अपेक्षा आपण पूर्ण करू शकलो नाही, आपल्यामुळे आपल्या पालकांना खाली मान घालावी लागेल या विचाराने विद्यार्थी आपली जीवनयात्रा संपवतात; मात्र आपल्या अशा जाण्याने पालकांना आयुष्यभराचे दुःख आपण देऊन जात आहोत याचा विचार हे विद्यार्थी केव्हा करणार ? मुलांच्या भविष्यासाठी त्यांनी सुंदर सुंदर स्वप्न पाहिलेली असतात, क्षणात या साऱ्या स्वप्नांचा चुराडा होतो. प्रेमात अपयश आल्याने ऐन तारुण्यात तरुण तरुणी आत्महत्येचा निर्णय घेतात; मात्र हे करताना त्यांच्या आई वडिलांनी त्यांच्यासाठी आजतागायत किती काय केले आहे याचा विचार ते केव्हा करणार. अपेक्षित जोडीदार मिळणे हेच जीवनाचे ध्येय असते का ? आपल्याला लहानाचे मोठे करण्यात आपल्या पालकांनी घेतलेले परिश्रम, त्यांनी आपल्याला लावलेली निरपेक्ष माया अशी क्षणात संपवून टाकायची असते का ? नोकरीत अपमानास्पद वागणूक मिळते, इतरांची प्रगती होते मात्र आपल्याला डावलले जाते, वरिष्ठ अधिकारी आपल्याला घालून पाडून बोलतात, आपल्यावर कामाचा ताण टाकतात ही कारणे जीवनयात्रा संपवण्यासाठी कारणीभूत कशी काय असू शकतात. प्रयत्न केल्यावर, इतरांची मदत घेतल्यावर या सर्वांवर उपाय खरंच सापडणार नाहीत का ? शेवटी प्रत्येकाचे नशीब हे वेगवेगळेच असते. व्यवसायात कर्जबाजारी झाल्याने काही जण टोकाचा निर्णय घेतात; मात्र आपल्या आत्महत्या करण्यामुळे कर्जाची परतफेड होणार आहे का ? आत्महत्या केल्याने तुमची मुक्तता होईल मात्र तुमच्या घरच्यांनी काय अपराध केला आहे ? काहीजण याही पुढे जाऊन आपल्या मागे घरच्यांना त्रास नको म्हणून मुला बाळांना संपवून स्वतः आत्महत्या करतात. ज्या निष्पाप जीवांचे या सुंदर दुनियेत नुकतेच आगमन झाले आहे त्यांना संपवण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला ? त्यांना मारताना आपल्या काळजाला भेगा कशा पडत नाहीत ?आपल्या कृत्यात त्या निष्पापांचा अपराध तो काय ?दुर्धरआजाराने कंटाळून आत्महत्या करणाऱ्यांनी हे भोग आपल्याच पदरी का पडले आहेत, आपली कर्मे या सर्वाला कारणीभूत आहेत का ? दुर्धर आजाराने ग्रस्त सर्वच जण आत्महत्या करतात का, हा विचार कधी केला आहे का ? कोणत्याही संकटावर आत्महत्या हा उपाय असूच शकत नाही. घरातील एकाच्या आत्महत्येमुळे सारे कुटुंब विस्कळीत होते. आत्महत्या तेच करतात ज्यांचे मन कमकुवत आहे. आत्महत्या हे मानसिक आजाराचे टोकाचे लक्षण आहे. आजमितीला भारतात ज्या प्रमाणात शारिरीक आजाराविषयी जागरूकता आहे त्या तुलनेत कितीतरी पटीने मानसिक आजाराविषयी गैरसमज आहेत. प्रत्येकाला जसा शारीरिक आजार होऊ शकतो तसा जीवनातील प्रसंगानुरूप मानसिक आजारही उद्भवू शकतो, त्यासाठी वेळीच मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्वाचे असते; मात्र 'मानसोपचार तज्ज्ञाकडे केवळ वेडेच जातात आणि आपल्याला काही वेड लागलेले नाही' असा फार मोठा गैरसमज भारतीयांत पसरला आहे, परिणामी सौम्य स्वरूपात असलेला मानसिक आजार कालांतराने उग्र स्वरूप धारण करतो. आणि त्यातूनच पुढे आत्महत्येसारखे टोकाचे निर्णय घेतले जाऊ शकतात. आत्महत्या करणाऱ्यांच्याप्रति समाज सहानुभूती दाखवत असला तरी भारतीय संविधानानुसार तो गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. आत्महत्या केली म्हणजे सुटका होईल या विचाराने आत्महत्या करणारा हे धाडस करतो, मात्र ही खऱ्या अर्थाने सुटका नसतेच असे अध्यात्म सांगते. अध्यात्मानुसार मानवासह प्रत्येक प्राणीमात्राच्या जन्म हा प्रारब्धभोग भोगून संपवण्यासाठी झालेला असतो. त्यामुळे जन्म आणि मृत्यू हे विधिलिखित असते. त्यामध्ये ढवळाढवळ करून स्वतःहून मृत्यू ओढवून घेतल्यास पृथ्वी लोकातील समस्यांपासून सुटका मिळेल; मात्र विधात्याच्या नियोजनात हस्तक्षेप केल्यामुळे आत्महत्या करणाऱ्याचा आत्मा पुढील अनेक वर्षे भुवलोकात हालअपेष्टा सहन करत तडफडत असतो. त्या सहन करून संपवल्याशिवाय त्याला पुढच्या योनीमध्ये जन्म मिळत नाही. ८४ लक्ष योनीचा फेरा पूर्ण केल्यानंतर मिळणाऱ्या मनुष्य जन्माचे सार्थक करणे विधात्याला अपेक्षित असते; मात्र स्वतःच्या कर्मदरिद्रीपणाने आत्महत्येसारखी पळवाट स्वीकारणाऱ्याची मृत्यूनंतरही सुटका नसते. त्यामुळे आत्महत्या करून सूटका होते हा केवळ गैरसमज आहे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

मारझोडी ..

मारझोडीच्या घटना
कशा येतात प्रकाशा
आज इथे उद्या तिथे
रक्ताळूलागे नकाशा

रोजचा नवाआक्रोश
अस्वस्थता आकाशा
ब्रेकिंग न्यूज शोधतो
कसलेक्रौर्य आधाशा

मारताना चित्रीकरण
नवीनजडलेली नशा
शंभर गुन्हे ओतप्रोत
कारण स्वयं विनाशा

डाग लागला मनुष्यां
चविष्टचर्चा महादशा
लाज वाटेलं राक्षसा
पिढ्याजनल्या अशा

अतिरेक क्रूर हिंसेचा
ओलांडल्यासिमारेषा
भले असे साश्रु नयने
पाहवी कसा तमाशा

कर्णबधिर रे मारेकरी
भीककुठलीआक्रोशा
सांगड घालती उद्देशा
भरगच्च भरावे कोषा

शस्त्र अस्त्रे बुबुक्षित
पालनकरती आदेशा
मृत्यूचेफर्मान सांगता
थरथर होतसे संदेशा

**– हेमंत मुसरीफ पुणे.**

# अनिलदादा माणुसकीचं मंदिर!

## नेता नव्हे, जनतेच्या हृदयातलं दीपस्तंभ!

कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्व या त्रिसूत्रीचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अनिलदादा जगताप. राजकारणाच्या रणभूमीत गेली तीन दशके सातत्याने जिल्हाप्रमुख पदावर कार्यरत असलेला, हजारो-लाखो माणसांच्या मनात आपले स्थान निर्माण करणारा आणि माणसं जपण्याच्या दुर्मिळ कलेचा धनी म्हणजे अनिलदादा!

ते केवळ एक जिल्हाप्रमुख नाहीत, ते बीडच्या मातीतील शिवसेनेचे एक शिल्पकार आहेत, ज्यांनी समाजाच्या प्रत्येक घटकासाठी आपले जीवन खुलं ठेवलं. माणसांच्या गर्दीत ओळख हरवून बसणाऱ्यापेक्षा, प्रत्येक माणसाला ओळख देणारा हा नेता 'सामान्यांतलाही असामान्य' ठरतो.

लग्नसमारंभ असो की गणेशोत्सवाची आरती, उद्घाटन असो की नवरात्रोत्सवातील उत्सव बीडच्या जनतेला एक आश्वासक चेहरा पाहायचा असतो - तो म्हणजे अनिलदादा जगताप. त्यांची एक हजेरी कार्यक्रमाच्या



प्रतिष्ठेला चार चाँद लावते. त्यांच्या गोड भाषेने, सौम्य स्वभावाने आणि मृदू वागणुकीने प्रत्येकाची मने जिंकली आहेत. ते लोकांच्या आयुष्यात मान्यवर नाही, तर 'आपला' माणूस म्हणून वावरतात.

राजकीय जीवन म्हणजे संघर्षांची शृंखला. अनिलदादांनाही अपयशाने हात धरायचा प्रयत्न केला, पण त्यांनी कधीही तडजोडींच्या वाटा निवडल्या नाहीत. जहरी राजकीय डावपेचांना सहन करूनही आपली निष्ठा जपणारे अनिलदादा म्हणजे निष्ठेच्या पायावर उभं असलेलं नेतृत्व.

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून दुर्लक्ष झालं. मात्र निष्ठा डळमळली नाही. आमंत्रणं अनेक आली, सत्तेचे गोडवे गायले गेले, पण अनिलदादांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि एकनाथ शिंदे यांचे नेतृत्व स्वीकारून शिवसेनेच्या खरी श्रद्धा व निष्ठेचा मार्ग निवडला.

हा निर्णय अनेकांसाठी आश्चर्याचा होता, पण बीडच्या जनतेने त्यामागचं मन ओळखलं. म्हणूनच एकनाथ शिंदे यांनीही अनिलदादांच्या त्या समर्पणाची दखल घेत, पुन्हा एकदा त्यांच्यावर जिल्हाप्रमुखपदाची धुरा सोपवली. ही केवळ नियुक्ती नव्हती, ही विश्वासाची पराकाष्ठा होती. शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांना हार्दिक शुभेच्छा.

पान १ वरून पुढे...

## कुटुंबापेक्षाही काकणभर....

या ठिकाणी आपण दरवर्षी येऊन ऊर्जा घेतो. लाखोंचा जनसमुदाय मला सातत्याने शक्ती देतो. हे प्रेम, ही शक्ती यापुढेही अशीच माझ्या पाठीशी राहावी अशी अपेक्षा ना. पंकजाताई यांनी व्यक्त केली. गोपीनाथ गडावर लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त रामायणाचार्य ह भ प रामराव महाराज ढोक यांचे कीर्तन झाले. या कीर्तनानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

तत्पूर्वी सकाळपासूनच गोपीनाथगडावर स्व. मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून मुंडेप्रेमींनी रीघ लावली होती. त्याचबरोबर स्मृतिदिनानिमित्त रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी शिबिर, वृक्ष रोपांचे वाटप, पशुसंवर्धन कॅम्प आदी उपक्रमही घेण्यात आले. या उपक्रमातही नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद घेतला. गोपीनाथ गडावर झालेल्या या कार्यक्रमाला व दर्शनाला राजकीय क्षेत्रातील नेतेमंडळी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोणाची दृष्ट न लागो आपल्या या वैभवाला: यावेळी काहीशी भावुक भावना व्यक्त करताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, आज अकरा वर्षे झाले माझे बाबा आणि आपले नेते आपल्यातून निघून गेलेले आहेत. त्यांचे संस्कार आणि विचार पुढे घेऊन जाणे हे आपले कर्तव्य आहे. त्या विचारावर वाटचाल करताना वंचितांचा वाली आणि वाणी होण्याचा आपण सातत्याने प्रयत्न केला आहे. आजच्या या क्षणी सर्व भावंडे सर्व परिवार गोपीनाथगडावर एकत्र आहे. याचा मुंडे साहेबांनाही मोठा आनंद निश्चितच होत असणार. वैभव म्हणजे गाडी, संपत्ती, पैसा हे नाही तर लाखोंचा जनसमुदाय व त्यांचे हे प्रेम हे खऱ्या अर्थाने आमच्या परिवाराचे वैभव आहे. कितीही यातना भोगण्याची वेळ आली तरी त्या जनतेच्या प्रेमासाठी आम्ही यातना भोगायला तयार आहोत.मात्र या वैभवाला कोणाची दृष्ट लागू नये असे वाटते असे पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले.

पान १ वरून पुढे...

आज मुंडे साहेब असते तर देशाच्या कारभारात मोठ्या पदावर असते: यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाचा संदर्भ देत ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, आज मुंडे साहेब असते तर निश्चितच ते देशाच्या केंद्रस्थानी कारभारात मोठ्या पदावर असते. केंद्रातील त्यांच्या सर्व सहकाऱ्यांसोबत सदैव ते आपल्याला दिसले असते. मात्र नियतीला हे मान्य नव्हते. त्यामुळे मुंडे साहेब आज आपल्यात नसले तरी त्यांचा वारसा, विचार आणि संस्कार आपल्या पाठीशी आहेत. त्या आशीर्वादावर निश्चितच मुंडे साहेबांना अभिप्रेत असा सामाजिक न्याय आपल्याला प्राप्त होईल असा विश्वास ना पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केला.

अकरा वर्षानंतरही ३ जून आली की वीज कोसळणाऱ्या त्या कटू आठवणी जाग्या होतात: यावेळी अकरा वर्षांपूर्वीच्या आपल्यावर कोसळलेल्या दुःखाच्या आठवणी आपल्याला आजही वीज कोसळल्याचाच अनुभव करून देतात असे सांगताना पंकजाताई मुंडे यांनी तो दुःखद प्रसंग सांगितला.अकरा वर्षांपूर्वी मुंडे साहेब आमच्यातून गेले तेव्हा खूप मोठं संकट खूप मोठी वीज आमच्या डोक्यावर कोसळली होती. दोन जूनला रात्री मुंडे साहेबांना मी शेवटचे बोलले तेव्हा ते मला सांगत होते की मला हेलिकॉप्टर पाहिजे कारण मला सत्काराला जायचंय. सत्काराला परळीला जायची सगळी तयारी झाली होती.अचानक सकाळी सहाच्या सुमारास फोन आला की बाबांचा एक्सीडेंट झाला आणि नियतीने आपलं सर्वस्वच हिरावून नेलं असा प्रसंग कोणावरच येउ नये असे ना. पंकजाताई यांनी सांगितले.

## ना. पंकजाताई...

ना.पंकजाताई मुंडे यांना सुपूर्द केली. यावेळी नितीन समशेट्टी, आश्विन मोगरकर, प्रितेश तोतला, अनिश अग्रवाल, राहूल घोबाळे आदी उपस्थित होते. आता या गोमातेचा गोपीनाथ गडावर सांभाळ केला जाणार आहे. गोपीनाथ गडाच्या पालक व राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे या अर्थाने गोमाता भेट ही अनोखी भेट ठरली आहे.

पान ४ वरून पुढे...

## पक्षाने संधी...

पदाच्या रिक्त जागेसाठी लवकरच पोट निवडणूक होणार असून या निवडणुकीत येथील सामाजिक कार्यकर्ते तथा सामान्य नागरिकांच्या मदतीसाठी नेहमीच मदतीला धावून येणारे नेतृत्व म्हणजे डॉ जे एन शेख यांना पक्षाने उमेदवारी दिली तर सरपंच पदासाठी निवडणूक लढवणार असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

## बिंदुसरा धरणावर...

ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी , आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड, उपविभागीय अधिकारी बीड,तहसीलदार बीड, पोलिस निरीक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन यांना केली आहे.

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने नागरीकांना सावधानता व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून केलेले आवाहन. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी केले आहे. जिल्हा प्रशासनाने सुचना करताना पाण्याचा प्रवाह अत्यंत वेगवान असुन अचानक पाण्याची पातळी वाढू शकते.त्यामुळे धरण परिसरात जाणे टाळावे, धरणाच्या काठावर उभे राहून फोटो किंवा सेल्फी घेणे अत्यंत धोकादायक असुन अपघाताची शक्यता असल्याने टाळावे तसेच पालकांनी मुलांना धरण परिसरात जाण्यापासून रोखावे आणि त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवावे आणि स्थानिक प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने केले आहे. मात्र याकडे पर्यटक दुर्लक्ष करताना दिसुन येत आहे.

२०२१ मध्ये बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडून २ युवकांचा दुर्दैवी मृत्यू

दररोजच्या पावसाने पाणी पातळीत वाढ होत असून धोक्यात जीव घालुन पर्यटक लोखंडी पुलावरून धरणांच्या धरणाच्या भिंतीवर व पायथ्याशी पर्यटक सांडव्याच्या ठीकाणी जमा होत असुन सांडव्याच्या भिंतीवर चढतात फोटो काढतात त्यानिमित्ताने पाय घसरून अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.पाठीमागे दि.१९ ऑक्टोबर २०२१ रोजी याच बिंदुसरा प्रकल्पाच्या सांडव्यातील पाण्याच्या डोहात बुडुन ओंकार लक्ष्मण काळे वय १६ वर्षे आणि शिव संतोष पिंगळे वय १६ वर्षे रा.शिंदेनगर,कॅनाल रोड बीड यांचा मृत्यु झाला होता.

सावधान प्रतिबंधक क्षेत्र असा बोर्ड लाऊन पाटबंधारे विभागाने जबाबदारी झटकली ; प्रकल्पावरील सुरक्षारक्षक नेमकं काय करतात ? ?

बिदुसरा धरणाच्या सांडव्याशेजारी धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील कडेला सावधान प्रतिबंधक क्षेत्र असा फलक लावण्यात आला असून अपघात,दुर्घटना अथवा जिवितहानी झाल्यास जलसंपदा विभाग जबाबदार नाही,कार्यकारी अभियंता जायकवाडी पाटबंधारे विभाग क्रमांक ३ बीड आदेशावरून असा फलक लावण्यात आला असून या तलावाच्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची संरक्षण व्यवस्था नसल्यामुळेच त्याठीकाणी अपघाताच्या घटना घडत असुन पाटबंधारे विभागाचे अधिकारी जबाबदारी झटकतात मात्र प्रकल्पाच्या सुरक्षिततेसाठी नेमलेले सुरक्षारक्षक नेमकं काय काम करतात असा प्रश्न उपस्थित होत आहे.त्यामुळे सुरक्षा रक्षक नेमण्यात यावेत.भविष्यात दुर्घटना घडल्यास संबधित जबाबदार आधिका-यांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

## गर्भाशय शस्त्रक्रिया...

राऊत यांनी केला आहे. चालू वर्षात १ जानेवारी २०२५ ते ३१ मे २०२५ या पाच महिन्यांच्या कालावधीत शासकीय रुग्णालयात झालेल्या गर्भाशय शस्त्रक्रियांची संख्या ९८ आहे यात ऊसतोड कामगार महिला किंवा वय वर्ष ३५ व त्याखालील ऊसतोड कामगार महिला यांची संख्या देखील ० इतकी आहे.

याच पाच महिन्यांच्या कालावधीत खाजगी रुग्णालयांमध्ये २६८ शस्त्रक्रिया झाल्या तर सहा शस्त्रक्रिया नाकारण्यात आल्या, यात गर्भाशय शस्त्रक्रिया केलेल्या ऊसतोड महिला कामगारांची संख्या ५२ इतकी आहे व त्यातील केवळ एक ऊसतोड कामगार महिला ३५ वर्षे वयाखालील असल्याचेही या लेखी खुलाशात म्हटले आहे.

हा विषय अत्यंत संवेदनशील विषय असून याचे गांभीर्य लक्षात घेऊन गेल्या दोन वर्षांपूर्वी याबाबत शस्त्रक्रिया कशा पद्धतीने होतील याची कार्यपद्धती निश्चित करून देण्यात आली आहे. यासंदर्भात अधिकृतपणे कोणतीही माहिती न घेता कोणी वृत्त देत असेल तर त्यास प्रसिद्धी देऊ नये असे आवाहन देखील याद्वारे करण्यात येत आहे.

## पिकाचा स्तर...

* राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान पोष्टीक तृणधान्य-ज्वारी,बाजरी

या राष्ट्रीय अन्न सूरक्षा आणि पोषण अभियान अन्नधान्य पिकाबाबत तसेच आभियानामध्ये सुधारित तंत्रज्ञानावर आधारित पीक प्रात्याक्षिके अंतर्गत मुलस्थानी जलसंधारण, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, सुधारित व प्रमाणित बियाणे शेतकरी प्रशिक्षणे इत्यादीची माहितीही यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पॉवरपॉइन्ट सादरीकरणाव्दारे जाणून घेतली.

## महावितरणच्या चुकीमुळे...

प्रस्ताव देखील शासनाला पाठवावा अशाही सूचना यावेळी धनंजय मुंडे यांनी केल्या.

मलिक पुरा भागातील आधार खान हे होतकरू तसेच धनंजय मुंडे यांचे सहकारी होते. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करण्याबरोबरच त्यांच्या कुटुंबाच्या मदतीसाठी ही पुढाकार घेतल्याने अझहर खान यांच्या कुटुंबीयांना दिलासा व आधार मिळाला आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, डॉ. संतोष मुंडे, राजेंद्र सोनी, सय्यद सिराज, शेख एजाज, श्रीकांत फड यांच्या सह स्थानिक पदाधिकारी व कुटुंबीय उपस्थित होते.

## गावातील अतिक्रमण...

अतिक्रमण काढण्याबाबत यापूर्वी नोटीस देऊन अतिक्रमण हटवण्याची सांगण्यात आले परंतु अद्याप अतिक्रमण जैसे तेच आहेत. अखेर दि ३ रोजी वाकी येथील आकाश पाटील, डॉ संतोष अडसूळ, नंदू ससाणे, विशाल ससाणे, सोनू कारंजकर, वैभव कारंजकर, गौतम ससाणे, बाळासाहेब ससाणे, अक्षय ससाणे, बापू कारंजकर, किसन कारंजकर, दीपक गायकवाड, बबन कारंजकर आप्पा कारंजकर, मनोहर साठे, हरि काळे, आकाश कोठे, बाबासाहेब ससाणे, बापू कारंजकर, आदी ग्रामस्थ दैठणा येथील ग्रा.पं कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले आहेत.

## पाटोदा तालुका...

नागरिकांनी केला आहे. तालुक्यातील दिवसाढवळ्या सुरू असलेल्या चोऱ्यांवर कुठलाही राजकीय नेता उघडपणे बोलताना दिसत नाही. जनतेच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असतानाही नेत्यांचं मौन अनेक प्रश्न निर्माण करत आहे.

नागरिकांची एकमुखी मागणी- गावोगावी सीसीटीव्ही अनिवार्य करा चोरट्यांच्या मुसक्या आवळण्यासाऊ

पाटोदा तालुक्यातील पोलीस यंत्रणा सक्रिय करा अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे

## वाल्मीक कराडवरील...

१७ तारखेला दोन्ही पक्षाचे ऐकून त्यावर ऑर्डर करेल. सध्या केवळ वाल्मीक कराडलाच मकोकामधून दोषमुक्त करावे अशी मागणी त्यांनी केली आहे. पुढे बोलताना निकम म्हणाले, न्यायालयात आम्ही वाल्मीक कराड व त्याच्या सहकाऱ्यांवर कोणते आरोप निश्चित करावे याची जंत्री मी न्यायालयात सादर केली होती. परंतु न्यायालयाने सांगितले की त्याच्या दोषमुक्तीचा निकाल झाल्यावर त्यानंतर त्यावर निर्णय घेऊ, दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले जाईल आणि त्यानंतर न्यायालय निर्णय घेईल.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात

### जिल्हा स्टेडियम येथे ६ जून रोजी आपदा मित्र प्रशिक्षणाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील २० जिल्हयात राबविण्यात आलेल्या Up Scaling apda Mita या प्रशिक्षणाचे यश विचारात घेऊन जिल्हा क्रिडा स्टेडियम, बीड येथे दि. ६ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता आपदा मित्र प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणामध्ये सहभागी उमेदवारांना नैसर्गिक आपत्तीचा सामना कशाप्रकारे करावा? याबाबतचे प्रशिक्षण एनडीआरएफ चे कुशल तज्ज्ञ प्रशिक्षक यांच्यामार्फत जिल्हा क्रिडा स्टेडियम बीड येथे विनामुल्य देण्यात येणार आहे. तसेच प्रशिक्षणा दरम्यान सहभागी उमदेवारांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभाग नोंदविणा-या प्रशिक्षणार्थी यांना १२ दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आपत्ती व्यवस्थापन किट व प्रमाणपत्र वाटप केले जाणार आहे. या प्रशिक्षाणामध्ये बीड मधील नागरिक, महाविद्यालयीन विद्यार्थी, एनसीसी कॅडेट, सामाजिक संस्था स्वयंसेवक, आशा, अंगणवाडीसेविका, होमगार्ड, पोलीस, खाजगी सुरक्षा रक्षक, शासकीय-निमशासकीय कर्मचा-यांनी सहभाग नोंदवावा असे, आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यांनी केले आहे.

### साठवणूक गृह या घटकाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महा डीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत

**बीड । प्रतिनिधी**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२५-२६ काढणीपश्चात व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत कमी खर्चाचे कांदाचाळ/लसूण साठवणूक गृह या घटकाचे प्रकल्प करिता शेतक-यांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. बीड राज्यात कांदा पिकाचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असून शेतकरी सर्वसाधारणपणे कांदा जमिनीवर पसरवून ठेवून किंवा स्थानिकरित्या तयार केलेल्या चाळीमध्ये कांद्याची साठवणूक करतात. त्यामुळे कांदा सडून मोठया प्रमाणावर नुकसान होते. तसेच कांद्याची प्रत व टिकाऊपणा यावर विपरीत परिणाम होतो. शास्त्रशुध्द कांदाचाळ उभारणीमुळे कांद्याची योग्यगुणवत्ता राखली जाऊन शेतकर्यांना अधिक नफा मिळत असल्याने कांदाचाळ उभारणीकडे शेतकर्यांचा कल वाढत आहे. सदर योजनेचा लाभ वैयक्तिक कांदा उत्पादक शेतकरी, शेतकयांचा गट, स्वयंसहायता गट, शेतकरी महिला गट, शेतकयांचे उत्पादक संघ Farmers Producer Organizations FPO), नोंदणीकृत शेतीसंबंधी संस्था, शेतकरी यांच्या सहकारी संस्था,सहकारी पणन संघ यांना घेता येईल. तरी सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते कि, काढणीपश्चात व्यवस्थापन कार्यक्रम ांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कांदाचाळ /लसूण साठवणूक गृह या घटकाचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.gov.in संकेतस्थळावर फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत. योजनेच्या अधिक माहितीसाठी संबधित नजीकच्या तालुका व उपविभागीय कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा.

### फळपिकांच्या बागांचे पुनरूज्जीवन करणे अळिंबी उत्पादन प्रकल्पासाठी शेतक-यांनी अर्ज करावेत

**बीड । प्रतिनिधी**

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान सन २०२५-२६ अंतर्गत क्षेत्र विस्तार कार्यक्रम फळे, फुले, मसाला लागवड व आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबु, पेरु, आवळा या फळपिकांच्या जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन करणे तसेच, अळिंबी उत्पादन प्रकल्प करिता शेतक-यांनी अर्ज करावेत असे आवाहन करण्यात येत आहे. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत सन २०२५-२६ अंतर्गत फळे, फुले, मसाला लागवड, अळिंबीउत्पादन प्रकल्प व जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन हा घटक राबविण्यात येत आहे. यामध्ये विदेशी फळे, फुले, मसाला लागवड व आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबु, पेरु, आवळा या फळपिकांच्या जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन करणे तसेच, अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी करणे या बाबींचा समावेश आहे. राज्यात व बीड जिल्ह्यात विदेशी फळे, फुले, मसाला या पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढविणे तसेच जुन्या फळबागांची उत्पादकता वाढविणे या दृष्टीने सदरचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या घटकांचे अनुदान खालीलप्रमाणेआहे. तरी सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, विदेशी फळे, फूले, मसाला लागवड व अळिंबी उत्पादन प्रकल्प उभारणी करणे तसेच, आंबा, चिकू, संत्रा व मोसंबी, लिंबू, पेरु, आवळा या फळपिकांच्या बागा असलेल्या अधिकाधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टल mahadbtmahait.gov.in वर फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत योजनेच्या अधिक माहितीसाठी संबंधित जवळच्या तालुका कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा.

# स्व. मुंडे साहेबांमुळे आमच्या कुटुंबाला आमदारकी मिळाली : बाळराजे पवार

## गोपीनाथगडावर जाऊन बाळराजे पवारांनी लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडेंना केले आभिवादन

**गेवराई । प्रतिनिधी**



स्व. मुंडे साहेबांमुळे आमच्या कुटुंबाला आमदारकी मिळाली. त्यांनीच राजकारणात आणून, डोक्यावर हात ठेवला आमच्या मध्ये एक वेगळ्या नात्याची वीण तयार झाली होती. ते ऋणानुबंध आज शब्दात सांगता येत नाहीत. अशी भावना व्यक्त करून, युवा नेते बाळराजे पवार यांनीलोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त गेवराईचे गोपीनाथगडावर जाऊन अभिवादन केले. स्व.गोपीनाथरावजी मुंडेच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी, आपल्या भावना व्यक्त करतांना बाळराजे पवार यांनी लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या आठवणीना उजाळा देतांना ते म्हणाले की, २०१३ साली स्व.गोपीनाथ मुंडे यांनीच आमच्या कुटुंबाना गेवराईच्या राजकारणात सक्रिय केले. भारतीय जनता पक्षाकडुन माझे बंधू लक्ष्मण पवार यांना विधानसभेची उमेदवारी दिली. आशीर्वाद देऊन निवडून आणले. आमदार केले. आमच्या सारख्या राजकारणातून बाजुला गेलेल्या अनेक कुटुंबातील लोकांना स्व.गोपीनाथ मुंडेनी सत्तेत आणण्याचे काम केले आहे. आम्ही त्यांच्या विश्वासाला पात्र राहण्याचा इमानदारीने प्रयत्न केला आहे. असे सांगून, बाळराजे पवार म्हणाले, स्व.गोपीनाथ मुंडे ही व्यक्ती नसुन एक विचार आहे. तोच विचार पुढे घेऊन जाण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहुत, अशा भावना व्यक्त बाळराजे पवार यांनी स्व.गोपीनाथ मुंडेना अभिवादन केले आहे

यावेळेस संतोष हागे, प्रमोद मोटे, ईश्वर पवार, कृष्णा ढाकणे, लक्ष्मण मुंडे, प्रशांत राख, संतोष वनवे, विष्णुपंत आतकरे, बाळासाहेब उबाळे, श्रिराम घाटुळ ,संतोष राठोड, प्रकाश गाडे, आदि उपस्थित होते

# ईदच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी घेतला कायदा व सुव्यवस्थेचा आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी ईद सणानिमित्त मुंबईबरोबरच राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आढावा घेतला. आगामी ईदच्या पार्श्वभूमीवर राज्यात कायदा व सुव्यवस्था चोख राखण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक घेण्यात आली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार सर्वश्री अस्लम शेख, अबू आझमी, अमीन पटेल, रईस शेख, श्रीमती सना मलिक, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इकबालसिंह चहल, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, पोलीस म



हासंचालक रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त देवेन भारती, संबंधित विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते. महाराष्ट्रात सण-उत्सव काळात कायदा सुव्यवस्था नेहमीच उत्तम राखली जाते. त्याचप्रमाणे आगामी ईदसाठी देखील शासनाने योग्य नियोजन केले असून या काळात कायदा व सुव्यवस्था चोख राखत सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे आदेश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिले.

# राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत डाळिंब पिकासाठी ॲन्टी हेलनेट कव्हर तंत्रज्ञानाच्या लाभासाठी शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**जळगाव । प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील कोरडवाहू क्षेत्रात डाळिंब पिकाचे उत्पादन खूपच महत्त्वाचे ठरते. परंतु, यासाठी कीटक व फळमाशीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होत असल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसतो. शेतकऱ्यांचे नुकसान कमी करण्यासाठी राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत डाळिंब पिकासाठी ॲन्टी हेलनेट कव्हर तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात येणार आहे.

राज्यात नाशिक, धुळे आणि जळगाव जिल्ह्यांतील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना हे तंत्रज्ञान वापरासाठी अनुदानावर देण्यात येणार असून, क्षेत्र मर्यादा २० गुंटे ते १ एकर दरम्यान प्रति लाभार्थी लाभ देय राहील. खर्चाचे मापदंड रु.४,२४,६४०/- प्रती एकर व अनुदान मर्यादा रु.२,१२,३२०/- प्रती एकर (खर्चाच्या ५० टक्के) इतकी आहे.

याकरिता आवश्यक कागदपत्रे ॲग्रीस्टॅक फार्मर आय डी, ७/१२ (डाळिंब पिकाच्या नोंदीसह), ८-अ. आधार कार्डाची छायांकित प्रत, आधार संलग्न बँक खात्याचा पासबुकच्या प्रथम पानाची छायांकित प्रत, जात प्रमाणपत्र (अनु. जाती/अनु.जमाती शेतक-यांसाठी), विहित नमुन्यातील हमीपत्र, बंधपत्र, चतुःसीमा नकाशा. या योजनेंतर्गत ॲन्टी हेलनेट कव्हर प्रकल्पासाठी अर्ज करण्यासाठी https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/griLogin/griLogin या संकेतस्थळावर जाऊन अर्ज करता येईल. अधिक माहितीसाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी.

सर्व प्रवर्गातील शेतक-यांनी महाडीबीटी पोर्टलवर https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/griLogin या संकेस्थळावर जास्तीत जास्त शेतक-यांनी या घटकासाठी अर्ज करावेत असे आवाहन विभागीय कृषि सहसंचालक सुभाष काटकर यांनी केले आहे.

# 'दिलखुलास' कार्यक्रमात रासायनिक तंत्रज्ञान संस्थेचे प्रा. जी. डी. यादव यांची मुलाखत

**मुंबई । प्रतिनिधी**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात रासायनिक तंत्रज्ञान संस्था (आयसीटी) या संस्थेचे माजी कुलगुरू प्रा. जी. डी. यादव यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. 'दिलखुलास' कार्यक्रमात ही मुलाखत बुधवार दि. ४, आणि गुरूवार दि. ५, जून २०२५ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व 'न्यूज ऑन एआयआर' या मोबाईल पवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे, ज्येष्ठ निवेदक प्रसाद मोकाशी यांनी ही मुलाखत घेतली आहे. रासायनिक तंत्रज्ञान संस्था म्हणजेच इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी (आयसीटी) ही मुंबईतील एक प्रतिष्ठित शैक्षणिक आणि संशोधन संस्था आहे. या संस्थेअंतर्गत रासायनिक अभियांत्रिकी, तंत्रज्ञान आणि औषध निर्माणशास्त्रात विशेष कामकाज केले जात आहे. उद्योगांना नवीन तंत्रज्ञान आणि उत्पादने विकसित करण्यासाठी या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना रासायनिक अभियांत्रिकी, तंत्रज्ञान, औषध निमर्णशास्त्र आणि संबंधित क्षेत्रांमध्ये व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते. या संस्थेचे माजी कुलगुरू तसेच प्रा. जी. डी. यादव यांनी हरित रसायनशास्त्र व अभियांत्रिकी, उत्प्रेरक विज्ञान, रासायनिक अभियांत्रिकी, ऊर्जा अभियांत्रिकी, जैवतंत्रज्ञान, नॅनोटेक्नॉलॉजी आणि स्वच्छ व हरित तंत्रज्ञानाच्या विकासात उल्लेखनीय कार्य केले आहे.

# महा ई-सेवा केंद्राकडून विद्यार्थ्यांची होणारी लूट शासनाने थांबवावी अन्यथा मनसे स्टाईल धडा शिकवू-सोमेश कदम



**बीड । प्रतिनिधी**

सध्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतींसाठी किंवा शुल्कामध्ये सवलत मिळण्यासाठी महा ईसेवा केंद्राकडून प्रमाणपत्र काढायची असतात परंतू जिल्ह्यातील व तालुक्यातील महा ई सेवा केंद्राकडून विद्यार्थ्यांची मोठी लूट होत आहे ती थांबवावी अशी मागणी मनसेचे जिल्हा सचिव सोमेश कदम यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे दिली आहे. तसेच विद्यार्थ्यांची लूट केल्याचा प्रकार कोठेही घडल्यास मनसे स्टाईल धडा शिकवू असा इशारा पत्रकाद्वारे दिला आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटल आहे की, सध्या शैक्षणिक सवलतींसाठी किंवा शिष्यवृत्तीसाठी जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र इत्यादी प्रमाणपत्र ही महा ई सेवा केंद्राकडून मिळतात परंतू महा ई सेवा केंद्रचालक अव्वा ची सव्वा फीस घेवून गोर-गरीब विद्यार्थ्यांची लूट करीत आहेत जन मनसेच्या कानावर अशा तक्रारी आल्या तर त्यांना आम्ही मनसे स्टाईल धडा शिकवू तसेच जिल्हाधिकारी साहेबांनी देखील याकडे लक्ष देण्याची मागणी विनंती निवेदनाद्वारे केली आहे.

# 2022 मध्ये केलेली गट गण रचना होणार रद्द ! 2017 च्या संख्येवर जिल्हापरिषद गट रचनेच्या हालचाली

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या दृष्टीने आता हालचाली वेग घेत असल्याचे चित्र आहे. जिल्हापरिषद आणि पंचायतसमित्यांसाठी गट गण रचनेची तयारी करण्याच्या सूचना राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा प्रशासनाला दिल्या आहेत. यांसंदर्भाने २०२२ मध्ये करण्यात आलेली गट गण रचना रद्द करण्याच्या हालचाली सुरु असून २०१७ च्या सदस्यसंख्येवर आधारित गट गण रचना होईल असे संकेत मिळत आहेत.

राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वारे आता वेगाने वाहू लागले आहे. दोन दिवसांपूर्वी राज्य निवडणूक आयोहाने या निवडणुकांसंदर्भात जिल्हा प्रशासनातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यात प्रभाग रचना आणि गट गण रचनेच्या संदर्भाने तयार राहण्याच्या सूचना आयोगाने दिल्या आहेत. गट गण रचनेचे प्रारूप तयार ठेवण्याचे देखील सांगण्यात आले आहे. विशेष म्हणजे २०१७ साली ज्या सदस्यसंख्येवर आधारित रचना करण्यात आली त्याच रचनेवर आता पुन्हा गट गण रचना होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

**२०२२ च्या प्रभाग रचनेत काय घडले होते ?**

२०२२ च्या निवडणुकांसाठी जी प्रभाग रचना आणि गट गण रचना करण्यात आली होती, त्यात २०११ च्या जनगणनेत लोकसंख्येत १० % वाढ झाली असे गृहीत धरून त्यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या निश्चित करण्यात आली होती. जिल्हापरिषदांसाठी पूर्वी किमान ५० आणि कमाल ७५ सदस्य असे सूत्र होते. २०२२ मध्ये ते सूत्र किमान ५५ आणि कमाल ८० असे करण्यात आले होते. त्यामुळे प्रत्येक जिल्हा परिषदेत सदस्यांची संख्या वाढली होती. बीड जिल्हापरिषदेतही ७ सदस्य वाढविण्यात आले होते. त्यामुळे प्रशासनाने ६७ गटांची रचना केली होती. मात्र त्या रचनेआधारे निवडणुकांचं होऊ शकल्या नाहीत.

**२०१७ मध्ये असे होते गट**

२०२२ च्या रचनेत ६७ जिल्हापरिषद गट प्रस्तावित करण्यात आले होते . आता ते जवळपास बारगळल्यात जमा असून २०१७ च्या संख्येप्रमाणे गट टाचण अपेक्षित आहे. २०१७ साली बीड जिल्हा परिषदेत ६० सदस्य होते. यात गेवराई ९, बीड ८, आष्टी ७, परळी, अंबाजोगाई, माजलगाव प्रत्येकी ६, शिरुरकासार ४, पाटोदा, धारूर प्रत्येकी ३ तर वडवणी २ अशी सदस्य संख्या होती.

**अनेकांची होणार गोची**

२०२२ मध्ये सरकारने सदस्य संख्या वाढविल्यानंतर एकट्या बीड जिल्ह्यात ७ जिल्हापरिषद गट आणि १४ पंचायत समिती गण वाढणार होते, त्यामुळे अनेकांनी आपापल्या सोयीने गट आणि गण बांधणी केली होती. मात्र त्या निवडणुका झाल्याचं नाहीत आणि आता पुन्हा सदस्यसंख्या कमी होणार असेल तर २०१७ सारखेच गट होतील, त्यामुळे नव्याने बांधणी केलेल्या अनेकांची गोची होणार आहे.

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २९/२०२५**

**दत्ता नामदेव ठेंगल विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय लिंबारूई(मु.)**

पहा

**१- दत्ता पि. नामदेव ठेंगल, रा. लिंबारूई (मु.) ता.जि.बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक **विशाल दत्ता ठेंगल** यांचा दिनांक ०५/०१/२००८ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहून अर्जदार यास जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास **लिंबारूई (मु.)** ता. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालय **लिंबारूई (मु.)** ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १४/०५/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख १०/०६/२०२५ ही आहे.

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार**
**बीड**

CMYK

दैनिक ● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

बुधवार, दि.०४ जून २०२५


## पक्षाने संधी दिली तर सिरसाळा सरपंच पदाची निवडणुक लढविणार: डॉ जे एन शेख



**सिरसाळा । प्रतिनिधी**

सुप्रीम कोर्टाने सिरसाळा सरपंच अन्वर पट्टेदार यांना अपात्र केल्याने काही दिवसात सरपंच पदासाठी पोट निवडणूक होणार असून या सरपंच पदाच्या पोट निवडणूकीत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून संधी मिळाल्यास निवडणूक लढवणार असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते डॉ जे एन शेख यांनी व्यक्त केले आहे. कमी वय असताना देखील ग्रामपंचायत निवडणूक लढवण्याने सिरसाळा सरपंच अन्वर पट्टेदार यांना सर्वोच्च न्यायालयाने अपात्र केल्याने या सरपंच ▶▶ उर्वरित पान २ वर

# बिंदुसरा धरणावर पर्यटकांची हुल्लडबाजी सुरूच



### जिल्हा प्रशासनाच्या सावधानता अन सुरक्षिततेच्या आवाहनाकडे दुर्लक्ष ; सुरक्षारक्षक नेमण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराजवळील पाली येथील बिंदुसरा मध्यम प्रकल्प १०० टक्के पुर्णतः भरलेले असुन धरणाच्या सांडव्यावरून मोठ्या प्रमाणात पाणी वाहु लागले आहे या दृश्याचा अनुभव घेण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने धरण परिसरात गर्दी करत आहेत. मात्र सध्याची परिस्थिती अत्यंत धोकादायक असुन नागरीकांनी



सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण विभागाने दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन करून सुद्धा पर्यटकांना याचे गांभीर्य नसुन त्याकडे दुर्लक्ष करत धरणाच्या भिंतीवर, सांडव्यावर, पायथ्याशी पर्यटक जमा होत असून पर्यटकांच्या हुल्लडबाजी व हलगर्जीपणामुळे अपघात घडुन जिवितहानी होऊ नये यासाठी प्रतिबंधकात्मक उपाययोजना म्हणून सुरक्षारक्षक तैनात करण्यात यावेत तसेच संभाव्य दुर्घटना घडल्यास संबधित विभागाच्या जबाबदार आधिकार्यांवर प्रशासकीय करण्यात यावी अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश

## गर्भाशय शस्त्रक्रिया झालेल्या ऊसतोड कामगार महिलांची संख्या चुकीच्या पद्धतीने मांडण्यात आली

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये ८४३ महिलांची गर्भपिशवी काढली यात तीस ते पस्तीस वयोगटातील ४७७ महिला असल्याची बातमी काही वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केली आहे ही बातमी चुकीच्या माहितीवर आधारित असून याबाबत वस्तुस्थिती खालील प्रमाणे आहे. सन २०२४ मध्ये एक जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत संपूर्ण वर्षभरात बीड जिल्ह्यात शासकीय रुग्णालयांमध्ये ५२७ गर्भाशय शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यात गर्भाशय शस्त्रक्रिया केलेल्या एकूण ऊसतोड महिला कामगारांची संख्या केवळ ८ इतकी आहे. याच एक वर्षाच्या कालावधीत खाजगी रुग्णालयांमध्ये ६५६ गर्भाशय शस्त्रक्रिया झाल्या तर २२ प्रकरणी शस्त्रक्रिया नाकारण्यात आल्या यातील एकूण ऊसतोड कामगार महिलांची संख्या ५५ इतकी आहे व या दोन्ही गटात वय वर्ष ३५ व त्याखालील ऊसतोडीस जाणाऱ्या एकूण महिलांची संख्या ० इतकी आहे असा लेखी खुलासा बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय ▶▶ उर्वरित पान २ वर

## पिकाचा स्तर उंचावण्यासाठी शेतक-यांचे अभ्यासवर्ग घेण्याच्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**

पीकाचा स्तर उंचावण्यासाठी व शेतीतील पिकांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी शेतक-यांचा अभ्यासवर्ग घेऊन त्यानां पेरणी आणि बियाणा संदर्भात योग्य मार्गदर्शन करावे, पावासाचा अंदाज घेऊन पेरणी करावी की नाही जेणे करुन शेतक-यांचे बियाणे वाया जाणार नाही अशा सूचना जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मा अंतर्गत जिल्हा नियामक मंडळाच्या आयोजित बैठकीत दिल्या.



यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्ये जीवने, प्रकल्प उपसंचालक सुरज पाटील, महेंद्रा अण्ड महेंद्राचे व्यवस्थापक मंदार गडगे, कृषी भूषण दत्तात्रय जाधव विविध विभागाचे संबधित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

राज्याच्या कृषी विस्तार कार्यक्रमांना विस्तार विषयक सुधारणा करीता सहाय्य (आत्मा) आतंर्गत जिल्हा नियामक विषयाची माहिती व उर्वरित कामाबाबतच्या आराखडयाची माहिती पावरपॉईन्टव्दारे जिल्हाधिकारी यांना दर्शविण्यात आली

आत्माचे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापक यंत्रणा प्रकल्पाचे संचालक एस.एम साळवे यांनी प्रस्ताविक केले तर प्रकल्प उपसंचालक सुरज पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

कृषी विभागाकडून विविध विस्तार योजनेचा आढावा

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान कडणान्य

✻राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान- गहू

✻ राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान- उस

✻ राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान- कापूस

✻ राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान- मका

✻ राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान भरडधान्य- मका

✻ राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान गळीतधान्य व तेलताड- सोयाबीन,भुइमुग,तीळ,जवस

▶▶ उर्वरित पान २ वर



*लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथी निमित्त गोपीनाथ गड येथे भाजपा नेते तथा माजी न.प.सभापती नवनाथ शिराळे, मा. नगरसेवक बाबुराव परळकर साहेबांच्या स्वाभिमानी पावन स्मृतीस अभिवादन करतांना.*

# महावितरणच्या चुकीमुळे मृत्यू झाला असेल तर मदतीचा प्रस्ताव तात्काळ पाठवा

## धनंजय मुंडे यांच्या सूचना अन् फैसला ऑन द स्पॉट

### सांत्वन पर भेटीसाठी आलेल्या धनंजय मुंडे यांनी अझहर खान यांच्या कुटुंबाला दिला आधार

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी शहरातील मलिकपुरा भागातील होतकरू तरुण अजहर खान यांचा महावितरणच्या तारेचा करंट लागून झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला होता. आज त्यांच्या कुटुंबाची सांत्वन पर भेट घ्यायला गेलेल्या माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या पुन्हा एकदा फैसला ऑन द स्पॉट या कार्यपद्धतीचा या निमित्ताने पुन्हा एकदा परळी करांना प्रत्यय आला.



अजहर खान यांचा मृत्यू हा उघड्या पडलेल्या तारेचा करंट लागल्याने झाल्याचे समजताच, धनंजय मुंडे यांनी तात्काळ त्या ठिकाणी महावितरणचे अभियंता श्री राठोड यांना बोलावून घेतले. त्यांच्याकडून वस्तुस्थिती समजून घेत महावितरण कडून जर तार उघडे राहिली असेल तर ती महावितरणची चूक असल्याने महावितरणच्या माध्यमातून अजहर खान यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी यासाठीचा प्रस्ताव तात्काळ शासनाला पाठवा अशा सूचना धनंजय मुंडे यांनी अभियंताची राठोड यांना केल्या.

परळी शहरात काही ठिकाणी काँक्रीट रस्त्याच्या मध्ये ट्रांसफार्मर आलेले आहेत त्यांचे शिफ्टिंग करण्यासह महावितरणच्या विविध अपग्रेडेशनच्या एकूण १५ कोटी रुपयांच्या विकास कामांचा प्रस्ताव देखील तातडीने पूर्ण करून तो ▶▶ उर्वरित पान २ वर

## गावातील अतिक्रमण काढण्यासाठी वाकी ग्रामस्थांचे ग्रा.पं कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु

### वेळोवेळी मागणी करुनही प्रशासनाने दखल न घेतल्याने उपोषणाचा पवित्रा

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील वाकी दैठणा पिंपळसुटी या ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत असणाऱ्या वाकी या १२०० लोकसंख्याच्या गावामधील रस्त्यावर स्थानिक नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण केल्याने रस्त्याने ये - जा करणे अवघड झाले तसेच जि. प. प्राथमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना रस्त्यावरील सांडपाण्याचा त्रास होत असल्याने ग्रामस्थांनी सदरील रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्यासाठी प्रशासनाकडे मागणी केली परंतु याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने अखेर ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा इशारा दिला होता.दि. ३ जून रोजी दैठणा येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर



स्थानिक नागरिकांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. प्रशासनाने आंदोलनाची दखल घेऊन सदरील अतिक्रमणावर कारवाई करावी अन्यथा यापुढे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा उपोषणाला बसलेल्या ग्रामस्थांनी दिला आहे.

आष्टी तालुक्यातील वाकी हे पैठण - बारामती या महामार्गावर १२०० लोकसंख्या असणारे गाव आहे या गावात मूलभूत सुविधाचा अभाव आहे. मुख्य रस्त्यावर स्थानिक नागरिकांनी अतिक्रमण केल्याने अरुंद रस्ताचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. नाल्या तुंबल्याने दलित वस्ती मधील बोअरवेल मधील पाण्यातुन आळ्या येऊ लागल्या आहेत.

▶▶ उर्वरित पान २ वर

## पाटोदा तालुका बनला भुरट्या चोरांचा अड्डा!

### दररोज एक चोरी पोलीस प्रशासन केवळ हतबल

**पाटोदा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुका सध्या भुरट्या चोरट्यांच्या विळख्यात अडकला असून, दररोज होणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. लोकांची झोप उडाली असून, चोरट्यांच्या धाडसी कारवायांमुळे पाटोदा 'चोरांचा अड्डा' बनतो की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे! गेल्या काही दिवसांपासून शहरासह तालुक्यातील विविध गावांमध्ये भुरट्या चोऱ्यांचं सत्र सुरू आहे.मोबाईल, दुचाकी, दुकानातील रोकड, शेती साहित्य चोरी यामध्ये झपाट्याने वाढ होत असून, आश्चर्य म्हणजे पोलिसांच्या हाती अजूनपर्यंत



एकाही चोरट्याचा ठोस सुगावा लागलेला नाही! जनतेचा संताप उसळला! रोज सकाळी कुठे तरी चोरीची घटना झाली असते. पोलिसांचं काम फक्त एफआयआर लिहिणं आणि 'तपास सुरू आहे' सांगणं इतकंच उरलंय का? असा थेट सवाल पाटोदा शहरातील ▶▶ उर्वरित पान २ वर

# वाल्मीक कराडवरील 'मकोका' हटणार ?

### १७ तारखेला कोर्टात रंगणार युक्तिवाद, सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची माहिती

**बीड । प्रतिनिधी**

बीड येथील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी केज न्यायालयात आज सुनावणी पार पडली. त्यानंतर सरकारी वकील उज्ज्वल निकम यांनी माध्यमांशी संवाद साधत सुनावणीदरम्यान काय घटना घडल्या तसेच कोणता युक्तिवाद करण्यात आला याची माहिती दिली आहे. वाल्मीक कराडने त्याच्या वकिलांच्या मार्फत न्यायालयात उत्तरे दिली आहेत, त्या अर्जाची चौकशी येत्या १७ तारखेला होणार असल्याची माहिती निकम यांनी दिली आहे.

वाल्मीकची मकोकामधून मुक्त करण्याची मागणी- उज्ज्वल निकम म्हणाले, वाल्मीक कराडने न्यायालयात वकिलांच्या मार्फत उत्तर दिलेले आहेत. त्या अर्जाची चौकशी १७ तारखेला होईल. त्या अर्जावर युक्तिवाद माझे सहकारी ड. कोल्हे हे करतील. तसेच या खटल्यात मला मकोका मधून दोषमुक्त करावे. त्यावर आम्ही कोर्टाला असे प्रस्तावित केले की याला दोषमुक्त करावे की याच्यावर आरोप निश्चित करावे आणि त्याप्रमाणे आम्ही जो निर्णय घ्यायचा आहे तो एकत्रित सुनावणीत घेण्यात यावा अर्थात यावर न्यायालयाने आणि बचाव पक्षाच्या वकिलांची हरकत असल्याने बचाव पक्षाकडून असे सांगण्यात आले की प्रथम त्याला



मकोकामधून मुक्त करावे. या अर्जावर चौकशी व्हावी, त्याला आम्ही हरकत नाही असे म्हटले. त्यामुळे आता वाल्मीक कराडला मकोकाच्या तरतुदी लागू होतात की नाही यावर १७ तारखेनंतर युक्तिवाद होतील.

पुढे बोलताना उज्ज्वल निकम म्हणाले, १७ तारखेला जे काही न्यायालयात अर्ज प्रलंबित होती त्यावर युक्तिवाद आणि न्यायालयाकडून निर्णय येईल. १७ तारीख ही अर्जांच्या चौकशीसाठी असल्याने मी त्या तारखेला उपस्थित राहणार नाही. परंतु ज्या-ज्या वेळेला महत्त्वाच्या घडामोडी असतील त्यावेळेला मी निश्चित न्यायालयात हजर असणार आहे. आणि तसेच माझे सहकारी ड. कोल्हे सरकारतर्फे १७ तारखेला बाजू मांडतील.

वाल्मीक व सहकाऱ्यांवर कोणते आरोप निश्चित करावे याची जंत्री न्यायालयात दिली- पुन्हा एकदा डिजिटल पुरावे मिळाले नसल्याचे बोलले गेले आहे का? असा प्रश्न विचारला असता, उज्ज्वल निकम म्हणाले, आज त्यांच्या सगळ्या शंकांची पूर्तता करण्यात आली आहे. न्यायालयात आता त्यावर फक्त ऑर्डर करायचे बाकी आहे ते आता ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK